मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल
बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा! : ९८३४१३८४८२
www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी-चिंचवड » गुरुवार, दि. 19 डिसेंबर 2024 | पान- 1

# महापालिका आणि सँडविक कोरोमंट इंडिया यांच्यात सामंजस्य करार

## प्लास्टिक रिसायकलिंग वेंडिंग मशीन बसवण्यासाठी सामंजस्य करार : पर्यावरणावर होणारा हानिकारक परिणाम कमी करण्यास मदत

**पिंपरी | प्रतिनिधी**

पर्यावर्णीय शाश्वततेसाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलत पिंपरी चिंचवड महानगरपालिका व सँडविक कोरोमंट इंडिया यांच्या सीएसआर पाठिंब्याने आणि थिंकशार्प फाऊंडेशनच्या सहकार्याने सहा प्रमुख ठिकाणी प्रगत प्लास्टिक रिसायकलिंग वेंडिंग मशीन बसवण्यासाठी सामंजस्य करार करण्यात आला आहे.

या अत्याधुनिक मशिन्सद्वारे नागरिकांना प्लास्टिकच्या बाटल्या जबाबदारीने योग्य ठिकाणी टाकण्याची सोय मिळेल. त्या बाटल्या क्रश करून त्याचा वापर सेफ्टी जॅकेट्स, टाईल्स, पेन व बेंचसारख्या उपयुक्त उत्पादनांमध्ये पुनर्वापर करण्यासाठी केला जाईल. या प्रक्रियेसाठी द शक्ती प्लास्टिक इंडस्ट्रीजची मदत घेण्यात येणार आहे. ही योजना प्लास्टिक कचऱ्याच्या वाढत्या समस्येवर तोडगा काढण्यासाठी आणि समाजात पुनर्वापर संस्कृती प्रोत्साहन देण्यासाठी आहे. या उपक्रमात नागरिकांच्या सक्रिय सहभागाने कचऱ्याचे प्रमाण आणि पर्यावरणावर होणारा हानिकारक परिणाम कमी करण्यास मदत मिळेल.

आयुक्त शेखर सिंह म्हणाले, हा उपक्रम प्लास्टिक कचऱ्याच्या समस्येवर उपाय म्हणून उपयुक्त ठरणार आहे. यामुळे पुनर्वापराचे महत्त्व नागरिकांमध्ये रुजविण्यास मदत मिळेल. यासोबतच हा उपक्रम शाश्वत, पर्यावरण-जागरुक समाज निर्माण करण्याच्या दिशेने एक पाऊल आहे. वाढत्या प्लास्टिक वापराच्या पार्श्वभूमीवर या मशिन्स प्लास्टिकच्या कचऱ्याचे प्रमाण कमी करण्यात, प्रभावी पुनर्वापर उपाय म्हणून शाश्वत उपाययोजनांचे उदाहरण निर्माण करण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावतील.



### उपक्रमाविषयी

» पिंपरी चिंचवड शहरात सायन्स पार्क , रामकृष्ण मोरे सभागृह, अटलबिहारी वाजपेयी उद्यान, यशवंतराव चव्हाण हॉस्पिटल व इतर अश्या एकूण ६ प्लास्टिक रिसायकलिंग वेंडिंग मशिन्स बसवण्यात येणार आहेत. यामुळे अनावश्यक ठिकाणी प्लास्टिकच्या बाटल्या टाकून पर्यावरणाला होणारी हानी नियंत्रणात येईल. हा उपक्रम नाविन्यपूर्ण आणि सहकार्याच्या माध्यमातून शाश्वत भविष्य घडवण्याच्या दृढ बांधिलकीचे प्रतीक आहे.

### प्रकल्पाचे महत्त्व

- » पर्यावरणीय परिणाम: प्लास्टिक कचऱ्याचे प्रमाण कमी करून स्वच्छ आणि हरित पर्यावरण प्रोत्साहित करणे.
- » जागरुकता निर्माण: नागरिकांना जबाबदार कचरा व्यवस्थापन सवयी आत्मसात करण्यासाठी प्रोत्साहन देणे.
- » नाविन्यपूर्ण पुनर्वापर उपक्रम: प्लास्टिक कचऱ्याचे रूपांतर उपयुक्त उत्पादनांमध्ये करणे, जसे की बेंच, ज्यामुळे पुनर्वापराच्या संधी वाढतील.
- » सामाजिक सहभाग: पर्यावरण संवर्धनात योगदान देण्यासाठी नागरिकांना सुलभ पर्याय उपलब्ध करून देणे.
- » हा प्रकल्प सँडविक कोरॉमंट इंडियाच्या सी. एस. आर उपक्रमांतर्गत राबविण्यात येत आहे. यामध्ये थिंकशार्प फाऊंडेशनद्वारे व शक्ती प्लास्टिक इंडस्ट्रीजची भागिदारी आहे.

---

# शत्रूनेही गौरविलेल्या स्वातंत्र्यवीर सावरकरांची स्वकीयांकडून होणारी उपेक्षा ही शोकांतिका : अपर्णा कुलकर्णी

## श्रीमन् महासाधू श्री मोरया गोसावी महाराज संजीवन समाधी सोहळ्यानिमित्त व्याख्यानाचे आयोजन

**पिंपरी | प्रतिनिधी**

स्वातंत्र्यवीर सावरकर यांनी फक्त देशातून नव्हे तर थेट शत्रूच्या घरात घुसून स्वातंत्र्याची लढाई लढली. इंग्लडमधील ज्या 'इंडिया हाऊस' मध्ये वास्तव्य करून सावरकरांनी या स्वातंत्र्यलढ्याचे प्रतिनिधित्व केले. त्याच इंडिया हाऊसच्या बाहेर आज तेथील ब्रिटिश सरकारने सावरकरांच्या गौरवार्थ फलक लावला आहे. म्हणजे ज्या इंग्रज सरकारविरोधात लढण्यात सावरकरांनी आपले आयुष्य पणाला लावले त्या शत्रूने त्यांचा गौरव केला. मात्र दुसरीकडे ज्या देशवासीयांसाठी त्यांनी हा लढा लढला त्याच देशवासीयांकडून आज त्यांची उपेक्षा होत आहे, यासारखी दुसरी शोकांतिका नाही, असे प्रतिपादन व्याख्यात्या अपर्णा कुलकर्णी यांनी केले.



चिंचवड देवस्थान ट्रस्ट यांच्या वतीने आयोजित श्रीमन् महासाधू श्री मोरया गोसावी महाराज संजीवन समाधी सोहळ्यात मंगळवारी (दि.१७) 'स्वातंत्र्यवीर सावरकर' या विषयावर अपर्णा कुलकर्णी यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी चिंचवड देवस्थान ट्रस्टचे मुख्य विश्वस्त मंदार देव महाराज हे उपस्थित होते.

आपल्या व्याख्यानात अपर्णा कुलकर्णी यांनी स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या आयुष्यातील झंझावाती कार्याचे साक्षीदार असलेल्या आठ महत्वपूर्ण स्थानांची महिती आणि माहिती सांगितली. त्या म्हणाल्या की, ज्याप्रमाणे श्री गणरायाची आठ महत्वपूर्ण तीर्थक्षेत्र अष्टविनायक म्हणून ओळखली जातात. त्याचप्रमाणे स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या जीवनात या आठ ठिकाणांना अष्टविनायकाएवढेच महत्व आहेत. ज्या ठिकाणांना भेट दिल्यानंतर आपल्याला देशप्रेमाची प्रेरणा मिळते.

---

# पीसीसीओईआरमध्ये आंतरराष्ट्रीय शिक्षण मेळावा संपन्न

## आंतरराष्ट्रीय शिक्षण मेळा अलिफ ओव्हरसीज, मुंबई यांच्या वतीने आयोजित करण्यात आला होता.

**पिंपरी | प्रतिनिधी**

पीसीइटीच्या पीसीसीओईआरमध्ये (२ सोमवारी) सकाळी १०:०० वाजता आंतरराष्ट्रीय शिक्षण मेळा अलिफ ओव्हरसीज, मुंबई यांच्या वतीने आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाचे उद्घाटन पीसीओइआरचे प्राचार्य डॉ. हरीश तिवारी, डॉ. रमेश राठोड, डॉ. कीर्ती धारवाडकर, डॉ. ऐश्वर्या गोपाल कृष्णन यांच्या हस्ते झाले.



या मेळ्यात ३० पेक्षा जास्त आंतरराष्ट्रीय विद्यापीठांचे प्रतिनिधी उपस्थित राहिले होते. या मेळाव्यात बीएसबीआय (जर्मनी), रॉयल हॉलवे (युके), युनिव्हर्सिटी ऑफ वेल्स ट्रिनिटी सेंट डेविड (युके), वेबस्टर युनिव्हर्सिटी (स्विझर्लंड), नॅशनल कॉलेज ऑफ आयर्लंड (आयर्लंड), लीड्स ट्रिनिटी (युके), हेरियट व्हॉट (युके), यूमास बोस्टन (युएसए), युनिव्हर्सिटी कॅनडा वेस्ट (कॅनडा) यांचा समावेश होता.

विद्यार्थ्यांना ईयू बिजनेस स्कूल (जर्मनी), जीआयसी (जर्मनी) आणि हुल्ट बिझनेस स्कूल (युएई) या संस्थांकडून मार्गदर्शन मिळाले. तसेच एचडीएफसी क्रेडीला, क्लब सेवेन फॉरेक्स आणि युनिव्हर्सिटी लिव्हिंग (अकॉमोडेशन वेंडर) या व्यवसायिकांनी विद्यार्थ्यांना माहिती दिली. न्युझीलँड, आयर्लंड या ठिकाणांचे शिक्षणाचे फायदे प्रवेश प्रक्रियेतील बारकावे समजावून सांगितले. या मेळाव्यात ३०० पेक्षा अधिक विद्यार्थी सहभागी झाले होते. त्यांना विविध देशांतील शिक्षण संधी व शिष्यवृत्ती बाबत माहिती देण्यात आली. पीसीइटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्ष पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांनी विद्यार्थी आणि इतर सहभागींचे या मेळाव्यात स्वागत केले.

# भूसंपादनाचे खरेदीखत चार दिवसात करा

## कात्रज-कोंढवा रस्त्यासाठी जागामालकांसोबत झालेल्या बैठकीत महापालिका आयुक्तांनी दिल्या सूचना

**पुणे | प्रतिनिधी**

कात्रज-कोंढवा रस्ता रुंदीकरणाचे काम गेल्या भूसंपादनाभावी आणि संथ गतीने चाललेल्या कामामुळे अनेक दिवसांपासून रखडले आहे. येत्या चार दिवसात जागेचे खरेदीखत करण्याचे आदेश महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांनी प्रशासनाला दिले आहेत.

या रस्त्याचे रुंदीकरण रखडल्यामुळे कात्रजकरांना वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत आहे. रस्त्यावरील वाहनांची मोठी वर्दळ असल्याने अपघात होत असून अनेकांना जीव गमवावा लागला आहे. याची दखल घेत केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्याकडून या रस्त्याच्या कामाचा आढावा घेतला जात आहे. त्या पार्श्वभूमीवर या रस्त्याचे काम वेगाने करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. त्यामुळे महापालिकेकडून रस्त्यासाठी आवश्यक असलेली जागा ताब्यात घेण्याचे काम वेगाने केले जात असून मोबदला देण्याचे हमीपत्र देऊन जागा ताब्यात घेतल्या जाणार आहेत. त्यामुळे येत्या चार दिवसात जागेचे खरेदीखत करण्याचे आदेश महापालिका आयुक्तांनी दिले आहेत.



वाहतूक कोंडीतून सुटका करण्यासाठी महापालिकेने रस्त्याच्या ५० मीटर रुंदीकरणाचे काम हाती घेतले होते. परंतु त्यात आता प्रशासनाने पुन्हा बदल करून ८४ मीटर रुंदीचा करण्याच्या दृष्टीने कार्यवाही सुरू केली आहे. त्यासाठी भूसंपादन करणे आवश्यक आहे. जागा ताब्यात घेण्याबाबत महापालिका आयुक्तांच्या दालनात सहा ते सात जागामालकांची बैठक सोमवारी (दि. १६) पार पडली. कात्रज चौकात उड्डाण पुलाचे काम सुरू केले आहे. या कामामुळे वाहतूक बंद करण्यात आली आहे. मात्र कात्रज-सातारा रस्त्यावरून सर्व्हीस रस्ता केल्याशिवाय पुलाचे काम करता येणार नाही. त्यामुळे भूसंपादन करणे आवश्यक आहे. त्यामुळे जागामालकांकडून जागा ताब्यात घेण्यासाठी चर्चा केली जात असून आयुक्तांच्या सहीचे हमीपत्र दिले जाणार आहे. त्यानंतर तत्काळ जागा ताब्यात घेतली जाणार आहे.

शहराच्या दक्षिण भागातील वाहतूक सुधारण्यासाठी कात्रज - कोंढवा रस्त्याच्या रुंदीकरणाचे काम हाती घेण्यात आले आहे. या रस्त्यावर वाहतूक कोंडी सातत्याने होत आहे. तसेच जड वाहनांची मोठी वर्दळ असते. त्यामुळे महापालिकेकडून ८४ मीटर रस्ता रुंदीकरण करण्याचा निर्णय घेतला आहे. या रस्त्याच्या कामासाठी राज्य सरकारकडून निधी मिळाला आहे. प्रामुख्याने कात्रज येथील राजस सोसायटी ते कोंढवा येथील खडी मशिन चौक या दरम्यानच्या रस्त्याचे रुंदीकरण करण्यात येणार आहे. या कामाला ३१ ऑक्टोबर २०१८ रोजी मान्यता मिळाली असून या भूसंपादन न झाल्याने रस्त्याचे काम रखडले आहे

दरम्यान, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी सदर रस्त्याची रुंदी ८४ मीटर करावी अशी सूचना केली होती. त्या सूचनेनुसार महापालिकेने आता सदर रस्त्याचे ८४ मीटरपर्यंत रुंदीकरण करण्यासाठी कार्यवाही सुरू केली आहे, अशी माहिती आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांनी दिली.

### राज्य सरकारकडून 140 कोटी रुपयांचा निधी

**» या रस्त्यांच्या भूसंपादनासाठी ७१० कोटी हवे आहेत. राज्य सरकारकडून १४० कोटी रुपयांचा निधी महापालिकेच्या तिजोरीत जमा झाला आहे. या निधीचे जागामालकांना वाटप केले जाणार आहे. काही भागात काम झाले असून, ग्रेड सेपरेटरचे काम सुरू आहे. जेथे जागा ताब्यात आल्या तेथे रस्ता बांधला जात आहे. रस्ता तुकड्या तुकड्यात कात्रज-कोंढवा रस्त्याचे काही प्रमाणात टीडीआर देऊन भूसंपादन झाले आहे. त्यामुळे हा रस्ता तुकड्या तुकड्यामध्ये तयार आहे. रस्त्यासाठी आवश्यक असलेल्या जागेच्या भूसंपादनाअभावी रस्त्याचे काम रखडले आहे.**

# स्वच्छ पुण्यासाठी महापालिका 'आक्रमक'

## 3 कोटी 7 लाख तिजोरीत; पाच वर्षांत आठपटीने वाढली दंडवसुली

**पुणे | प्रतिनिधी**

स्वच्छ पुणे सुंदर पुणे ठेवण्यासाठी एका बाजूला महापालिका दरवर्षी कोट्यवधीचा खर्च करत असली, तरी दरवर्षी जवळपास ४० ते ५० हजार नागरिकांकडून शहरात सार्वजनिक ठिकाणांसह शहरात वेगवेगळ्या प्रकारे कचरा करणे, तसेच नागरिकांच्या सार्वजनिक आरोग्यास धोका निर्माण होईल, असे कृत्य केले जाते. अशा नागरिकांवर महपालिकेकडून मागील काही वर्षांत कारवाईचा बडगा उगारण्यात आला असून, अशा अस्वच्छता करणाऱ्या नागरिकांवर केली जाणारी दंडात्मक करवाई जवळपास आठपटीने वाढली आहे.

२०२० मध्ये महापालिकेकडून शहरातील अस्वच्छता करणाऱ्या नागरिकांकडून तब्बल ४० लाखांचा दंड वसूल केला होता. हा दंडाचा आकडा २०२४ या वर्षात तब्बल ३ कोटी ७ लाखांच्या घरात पोहोचला आहे. विशेषत: मागील दोन वर्षांत महापालिकेने शहरात कारवाई वाढविली असल्याचे चित्र आहे. या दंडात्मक कारवाईमुळे अस्वच्छता करणाऱ्यांना चांगलीच जरब बसली आहे.



शहर स्वच्छतेसाठी महापालिकेकडून सार्वजनिक स्वच्छता उपविधी करण्यात आली आहे. त्यानुसार पालिकेकडून दंडात्मक कारवाईचे शुल्क निश्चित करण्यात आले आहे. या उपविधीची अंमलबजावणी गेल्या अडीच वर्षांपासून महापालिकेकडून मोठ्या प्रमाणात करण्यात येत आहे. या उपविधीनुसार सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकणे, कचरा जाळणे, सार्वजनिक ठिकाणी लघुशंका करणे, कचरा वर्गीकरण करून न देणे, बांधकामाचा राडारोडा टाकणे, बंदी असलेले प्लॅस्टिक वापरणे, पाळीवर प्राण्यांची शहरात अस्वच्छता करणे, कबुतरांना खाद्य टाकणे या नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई केली जाते.

महापालिकेकडून शहर स्वच्छतेसाठी नागरिकांमध्ये जनजागृती केली जाते. तरीही नागरिक सार्वजनिक ठिकाणी अस्वच्छता करतात. वारंवार सूचना देऊनही हा प्रकार कमी होत नसल्याने दंडात्मक कारवाई केली जाते. त्यासाठी प्रत्येक क्षेत्रीय कार्यालय स्तरावर स्वतंत्र पथके नेमली आहेत.

# सवलतीच्या गुणांसाठी प्रस्ताव पाठवा

## पुणे विभागीय मंडळ; शाळांना 15 जानेवारीपर्यंत मुदत

**पुणे | प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे फेब्रुवारी- मार्च २०२५ मध्ये घेण्यात येणाऱ्या इयत्ता दहावीच्या परीक्षेस प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांना शास्त्रीय कला, चित्रकला व लोककलेचे सवलतीचे वाढीव गुण देण्याबाबतचे प्रस्ताव पुणे विभागीय मंडळाकडे सादर करण्यासाठी शाळांना १५ जानेवारीपर्यंतची अंतिम मुदत देण्यात आली आहे.



चित्रकला क्षेत्रात प्रावीण्य मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांनी एलिमेंटरी व इंटरमिजिएट या दोन्ही परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. शास्त्रीय कला यामध्ये दोन वेगवेगळ्या संस्थांमधून विद्यार्थ्यांनी परीक्षा उत्तीर्ण केल्या असल्यास, दोन्ही संस्था शासन निर्णयामध्ये नमूद असलेल्या यादीमध्ये असणे अवश्यक आहे. दोन संस्थांमधून परीक्षा दिल्या असल्यास ३ री किंवा ५ वी परीक्षा उत्तीर्ण झालेल्या संस्थेने आधीच्या अन्य संस्थांकडील प्रमाणपत्र प्रमाणित करणे आवश्यक आहे.

कला सवलत गुणांसदर्भात शाळांनी परिपूर्ण प्रस्ताव सादर करण्यासाठी पालक, विद्यार्थी, संस्थांनी सहकार्य करावे. विद्यार्थी, पालक संस्था यांनी थेट विभागीय मंडळाशी संपर्क न साधता शाळेकडे प्रस्ताव सादर करावा व शाळेने मुदतीत विभागीय मंडळाकडे प्रस्ताव सादर करावा. कोणताही पात्र विद्यार्थी कला सवलतीच्या अतिरिक्त गुणांपासून वंचित राहणार नाही, याबाबत दक्षता घेण्याचे आवाहन मंडळाने केले आहे.

एखादा विद्यार्थी शास्त्रीय कला गायन, वादन, नृत्य, चित्रकला व लोककलेतील सहभाग यापैकी एकापेक्षा जास्त क्षेत्रात प्रावीण्य प्राप्त करीत असला, तरी कोणत्याही एकाच क्षेत्रासाठी सवलतीचे गुण जे उच्चतम आहेत, तेच घेण्यासाठी विद्यार्थ्यास शाळेमार्फत प्रथम प्राधान्याने कळविण्यात यावे, शाळाप्रमुखांनी दक्षता घ्यावी. अपूर्ण प्रस्ताव रद्द करण्यात येतील, अशा सूचना पुणे विभागीय मंडळाचे सचिव औदुंबर उकिरडे यांनी मुख्याध्यापकांना दिल्या आहेत.

# आता वेध महापालिका निवडणुकीचे

## 3 वर्षांपासून प्रशासकीय राजवट : नव्या वर्षात पालिकेसाठी रणकंदन, सगळेच लागले तयारीला

**पिंपरी | प्रतिनिधी**

लोकसभा, विधानसभा निवडणुका झाल्या आहेत. देशात भाजपप्रणीत राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे (एनडीए) तर राज्यात महायुतीचे सरकार आले आहे. त्यामुळे आता विविध पक्षाच्या स्थानिक पदाधिकारी, कार्यकर्त्यांना महापालिका निवडणुकीचे वेध लागले आहेत. निवडणूका ह्या मार्च-एप्रिलमध्ये होतील, त्यानुसार सगळ्या पक्षातील स्थानिक पदाधिकारी व कार्यकर्त्यांना महापालिका निवडणूकीची प्रतीक्षा लागली आहे. दरम्यान, महापालिका निवडणुका नव्या वर्षात होतील, अशी शक्यता वर्तवली जात आहे.

पिंपरी-चिंचवड महापालिकेवर मागील तीन वर्षांपासून प्रशासकीय राजवट आहे. या प्रशासकीय




राजवटीत शहरातील नागरिकांची कामे होत नसल्याने आजही स्थानिक माजी नगरसेवकांचे उंबरे नागरिकांना झिजवावे लागत आहेत. त्यामुळे प्रशासकीय राजवट नको म्हणून पक्षाचे स्थानिक पदाधिकारी, कार्यकर्ते राज्यकर्त्यांना सागत आहेत. परंतू, लोकसभा, विधानसभा निवडणुका होईपर्यंत मुदत संपलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणूका घेतल्या गेलेल्या नाहीत. त्यामुळे प्रशासकीय राजवटीत नागरिकांचे अतोनात हाल होत आहेत. महापालिका निवडणुकीत पुन्हा महायुती आणि महाविकास आघाडी अशी लढत होईल, अशी शक्यता वर्तवली जात आहे. तिकीटवाटप कसे होणार यांचे सुत्र ठरलेले नाही. आघाड्यामध्ये लढतीचा निर्णय झाल्यास शहरात धुसफूस निर्माण होण्याची शक्यता आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी स्थानिक पदाधिकारी जो निर्णय घेतील, त्यानुसार निवडणूक लढवली जाईल, असे अनेकदा जाहीर केले आहे. तर, माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी महाविकास आघाडीद्वारेच महापालिका निवडणुकीस सामोरे जाऊ, असे घोषित केले आहे.

राज्यात महायुती सत्तेत असल्याने शहरात महायुतीकडे इनकमिंग वाढण्याचे संकेत मिळत आहेत. महायुतीमधील भाजपसह राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना तसेच, आरपीआय या पक्षात इच्छुकांची भरमसाठ संख्या आहे. राज्यात मोठे यश मिळाल्याने साहजिकच भाजपकडे इच्छुकांची भाऊगर्दी झाली आहे. पाठोपाठ राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना आणि आरपीआयचे इच्छुकही कामाला लागले आहेत. दुसरीकडे विधानसभा निवडणुकीत कमकुवत झालेल्या महाविकास आघाडीकडेही ताकद कमी नाही. राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार), शिवसेना उबाठा , काँग्रेस, आप या पक्षाकडेही शहरात असंख्य इच्छुक आहेत. नवख्यांना येथे संधी मिळणार आहे.

### सर्वोच्च न्यायालयात सुनावणी प्रलंबित

» महापालिका निवडणुका किती प्रभाग सदस्यानुसार घ्याव्यात. तसेच, वाढीव लोकसंख्येनुसार प्रभागांची वाढती संख्या या संदर्भातील विविध याचिका सर्वोच्च न्यायालयात आहेत. त्याची अंतिम सुनावणी होणे प्रलंबित आहे. राज्य सरकारने प्रयत्न केल्यास सुनावणी प्रक्रिया लवकर होऊ शकते. न्यायालयाने परवानगी दिल्यानंतर लगेच निवडणुका जाहीर होतील, अशी स्थिती आहे.

# आळंदीत पिसाळलेल्या कुत्र्याची दहशत

## शहरातील 60 पेक्षा अधिक नागरिकांना घेतला चावा : नागरिकांमध्ये मोठी दहशत

**पिंपरी | प्रतिनिधी**

आळंदी नगरपरिषदेच्या हद्दीत भागीरथी नाल्यावर पिसाळलेल्या कुत्र्याने दोन दिवसांत तब्बल ६० पेक्षा अधिक नागरिकांना चावा घेतला. पिसाळलेला कुत्रा आळंदीत फिरत असल्याने दोन दिवसांपासून नागरिकांमध्ये मोठी दहशत पसरली आहे. दरम्यान, पिसाळलेल्या कुत्र्याचा त्वरीत बंदोबस्त करावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

आळंदीतील भागीरथी नाल्यावरून ये-जा करीत असताना रविवारी ( दि.१५) २० जणांना, सोमवारी (दि. १६) दुपारी दोनपर्यंत ४४ जणांना तर दुपारी दोननंतर आणखी दोन जणांना कुत्र्याने चावा घेतला. नागरिकांनी तक्रार केल्यानंतर पिंपरी-चिंचवड महापालिका पशु वैद्यकीय




विभागाच्या लोखंडी पिंजऱ्यात कुत्र्यास जेरबंद करून पुढील उपचारास सुपूर्द करण्यात आले.

दरम्यान, घडलेल्या घटनेमुळे आळंदीतील नागरिकांमध्ये मोठी नाराजी पसरलेली आहे. नागरिकांची सुरक्षितता जोपासण्यासाठी मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करण्याची मागणी विविध सेवाभावी संस्थासह आळंदी शहर भाजपचे संघटन सरचिटणीस भागवत काटकर यांनी केली आहे. काटकर यांनी आळंदी नगरपरिषद मुख्याधिकारी कैलास केंद्रे यांचे लक्ष वेधले. आळंदी नगरपरिषदेच्या आरोग्य विभागाने तात्काळ दखल घेत प्रतिबंधात्मक लशीकरण करण्यासाठी प्रशासनाने कामकाज करण्याची मागणी करण्यात आली.

### आंदोलनाचा इशारा

» आळंदी नगरपरिषदेने मोकाट कुत्र्यांचा तातडीने बंदोबस्त करावा. पाळीव कुत्र्यांच्या बाबतीतही नगरपरिषदेने धोरण ठरवावे, मोकाट कुत्र्यांचे लसिकरण करावे, अशी मागणी नागरिकांनी केली केली आहे. तसेच तत्काळ कार्यवाही न केल्यास सनदशीर मार्गाने आंदोलन करण्याचा इशाराही नागरिकांनी दिला आहे.

**मोकाट कुत्र्यांची संख्या वाढली**

आळंदीतील रस्ते, इंद्रायणी नदी घाट, मरकळ रस्ता, चावडी चौक, वडगाव रस्ता, भैरवनाथ चौक आदी ठिकाणी मोठ्या प्रमाणात मोकाट कुत्रे फिरत असतात. हे कुत्रे नागरिकांचे अंगावर धावून जातात. वडगाव चौक, चावडी चौक, मंदिर परिसर, मरकळ रस्ता, शालेय परिसरात फिरत असलेली मोकाट कुत्र्यांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

> “ आळंदी नगरपरिषद हद्दीतील भागीरथी नाल्यावर ६६ नागरिकांना पिसाळलेला कुत्रा चावला आहे. लहान मुले, महिला, ज्येष्ठ नागरिकांचा यात समावेश आहे. कुत्र्याने चावा घेतलेल्या नागरिकावर उपचार करण्यात आले आहेत.
>
> - डॉ. उर्मिला शिंदे, वैद्यकीय अधिक्षक, आळंदी नगरपरिषद.

# नवीन वर्षात महिलांना 'गुलाबी रिक्षा' मिळणार

## 3255 महिलांचा अर्ज, 744 महिलांचे अर्ज मंजूर : 'पिंक ई-रिक्षा' योजनेसाठी प्रतिसाद वाढला

**पुणे | प्रतिनिधी**

महिला आणि बालविकास विभागाच्या वतीने महिलांना रोजगार मिळवून देण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या 'पिंक ई-रिक्षा' योजनेसाठी प्रतिसाद वाढला असून, आतापर्यंत ३२५५ महिलांनी अर्ज केले आहेत. त्यांपैकी ७४४ महिलांचे अर्ज मंजूर झाले असून, नवीन वर्षात गुलाबी रिक्षा रस्त्यांवर धावणार आहेत.



महिला व बालविकास विभागाने ही योजना जाहीर केली असून, विधानसभा निवडणुकीच्या आचारसंहितेमुळे काम रखडले होते. आता पुन्हा अर्जनोंदणी आणि छाननी प्रक्रिया सुरू झाली आहे. सध्या आठ जिल्ह्यांतून ३२५५ महिलांनी अर्ज केले आहेत. त्यांपैकी ७४४ अर्ज मंजूर करण्यात आले आहेत. उर्वरित अर्जांची छाननी सुरू आहे. महिनाअखेर अर्जांची छाननी प्रक्रिया पूर्ण होणार असल्याने नवीन वर्षापासून गुलाबी रिक्षा रस्त्यावर धावू शकणार आहेत.

आतापर्यंत पुणे, कोल्हापूर, सोलापूर, छत्रपती संभाजीनगर, नाशिक, अहिल्यानगर, नागपूर आणि अमरावती या आठ जिल्ह्यांत प्राथमिक स्तरावर ही योजना राबविण्यात येणार आहे. त्यांपैकी सर्वाधिक ९६८ अर्ज नागपूर जिल्ह्यातून प्राप्त झाले आहेत. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातून ५६०, पुणे जिल्ह्यातून ३३१, कोल्हापूरमधून ११८, सोलापूर येथून २८५, नाशिकमधून ५३०, अहिल्यानगरमधून ३१६, अमरावती जिल्ह्यातून १४७ असे ३२५५ अर्ज दाखल झाले आहेत.

**काय आहे योजना?**

महिलांच्या रोजगारनिर्मितीस चालना मिळावी, तसेच त्यांना स्वावलंबी आणि आत्मनिर्भर करण्यासाठी 'पिंक ई-रिक्षा' योजना आखण्यात आली आहे. राज्याच्या अर्थसंकल्पात १७ शहरांतल्या १० हजार महिलांना रिक्षा खरेदीसाठी अर्थसहाय्य उपलब्ध करून देण्यात येणार आहे. त्यानुसार लाभार्थ्यांना केवळ १० टक्के रक्कम भरावी लागणार असून, २० टक्के अर्थसहाय्य राज्य सरकारकडून करण्यात येणार आहे. बँकेकडून ७० टक्के रक्कम उपलब्ध करून देण्यात येणार आहे. जिल्हास्तरावर अग्रणी बँकांची यादी तयार करण्यात आली आहे. या बँकांसोबत करार करण्यात आले आहेत.

**जिल्हा – प्राप्त अर्ज – मंजूर अर्ज**

पुणे – ३३१ – ७३
कोल्हापूर – ११८ – ४८
सोलापूर – २८५ – ८६
छत्रपती संभाजीनगर – ५६० – १११
नाशिक – ५३० – २२२
अहिल्यानगर – ३१६ – ५४
नागपूर – ९६८ – १०२
अमरावती – १४७ – ४८
एकूण – ३,२५५ – ७४४

> लाभार्थी महिलांचे अर्ज प्रादेशिक परिवहन विभागाकडून (आरटीओ) भरून घेण्यात येणार आहेत. या रिक्षांसाठी वाहतूक परवाने, चार्जिंग स्थानके, थांबे निश्चित करण्यात आले आहेत. या रिक्षा महिलांनाच चालविण्याची परवानगी असणार आहे. 'आरटीओ'कडून लाभार्थ्यांचे अर्ज भरून घेण्यात येत असून, विशेष परवाने देण्यास सुरुवात करण्यात आली आहे.
> **– स्वप्नील भोसले, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, पुणे.**

> राज्य शासनाच्या निर्देशानुसार 'पिंक ई-रिक्षा' योजना १७ जिल्ह्यांत राबविण्यात येणार आहे. त्यानुसार जिल्हास्तरावर जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली आहे. १० हजार महिलांना या योजनेचा लाभ देण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. आतापर्यंत ३२५५ अर्ज आले आहेत. अर्जांची संख्या वाढल्यास लॉटरी पद्धतीचा अवलंब करून लाभार्थ्यांची निवड करण्यात येणार आहे. नवीन वर्षात गुलाबी ई-रिक्षा रस्त्यावर धावू शकणार आहेत.
> **– प्रशांत नारनवरे, आयुक्त, महिला व बालविकास विभाग.**

# कांद्याचे भाव आले निम्म्यावर; शेतकरी आर्थिक अडचणीत

## या महिन्यात कांद्याचा भाव 300 ते 350 रुपयांवर उतरल्याने शेतकरी हवालदिल

**पुणे | प्रतिनिधी**

मागील महिन्यात 10 किलोला 600 ते 700 रुपये पार केलेला कांदा या महिन्यात कांद्याचा भाव 300 ते 350 रुपयांवर उतरल्याने शेतकरी हवालदिल झाला आहे. एकीकडे उत्तर पुणे जिल्ह्यात सर्वत्र कांदा लागवड सुरू आहे. त्यासाठी शेतकऱ्यांना कांदा रोपे उपलब्ध होत नाहीत, ज्यांच्याकडे उपलब्ध झाली आहेत, त्यांना कांदा लागवडीसाठी मजूर उपलब्ध होत नाहीत, अशीही अवस्था झालेली आहे. त्यामुळे शेतकरीवर्गात नाराजी पसरलेली आहे.



नोव्हेंबर महिन्यात कांद्याचा उच्चांकी बाजारभाव होता. चांगला जुना कांदा सुमारे 70 रुपये किलोपर्यंत विकला गेला होता. त्यामुळे शेतकरी वर्ग आनंदीत होता. त्यानंतर केंद्र सरकारने अफगाणिस्तानचा कांदा आयात केला, या आयातीमुळे कांद्याचे बाजार भाव पडतील या विचाराने शेतकऱ्यांनी आपला जुन्या कांद्याबरोबर नवीन कांदा काढणीस सुरुवात केली.

डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यात जरी अफगाणिस्तानचा कांदा बाजारात येत होता, तरी 50 ते 60 रुपये एवढा भाव टिकून राहिला होता. मात्र मागील काही दिवसात ढगाळ वातावरण झाल्याने शेतकऱ्यांनी कांदा काढणीस मोठ्या प्रमाणावर सुरुवात केली. त्यामुळे बाजारभाव गडगडायला सुरुवात झाली.

मंचर बाजार समितीत रविवारी (दि. 15) झालेल्या कांद्याच्या लिलावात सुमारे 24 हजार पिशव्या आल्या होत्या, त्यापैकी 214 पिशव्यांना 351 ते 400 रुपये 10 किलोस बाजारभाव मिळाला. सुपर कांदा 300 ते 350, सुपर मिडीयम कांदा 260 ते 320, गोल्टी कांदा 100 ते 300, तर बदला कांदा 60 ते 120 रुपये असा 10 किलोस बाजारभाव मिळाला.

लोणी उपबाजार समितीत झालेल्या लिलावामध्ये सुपर कांद्यास 330 ते 351, सुपर मिडीयम कांदा 230 ते 325 रुपये, गोल्टी कांदा 110 ते 220, बदला व चिंगळी कांदा 50 ते 100 रुपये असा 10 किलो बाजारभाव मिळाले.

एकीकडे कांदा काढणी सुरू असतानाच ज्या शेतकऱ्यांची कांदा काढून शेती दुसऱ्या पिकासाठी तयार झाली आहे. त्या शेतकऱ्यांनी कांदा लागवडी सुरू केल्या आहेत. बहुतांश शेतकरी हे बाजारामध्ये असणाऱ्या कांद्याच्या बियाण्यापेक्षा परिसरातील शेतकऱ्यांकडील खात्रीशीर बियाणे घेऊन रोपे तयार करत असतात. तर काही शेतकरी ज्या शेतकऱ्यांकडे मोठ्या प्रमाणावर रोपे उपलब्ध आहेत, त्यांच्याकडून विकत घेत लागवड करतात.

सध्या सर्वत्र कांदा लागवडीचा हंगाम सुरू आहे. लागवडीसाठी मजुरांची मात्र टंचाई निर्माण झाली आहे. मजुरही शेतकऱ्यांची अडचण लक्षात घेत रोजंदारी वाढून मागत असल्याचे वाळुंजनगर येथील बाबाजी वाळुंज यांनी सांगितले.